# प्रस्तावना

मोक्षमार्गस्य नेतारं, भेत्तारं कर्मभूभृताम् ||

ज्ञातारं विश्वतत्त्वानां, वंदे तद्‌गुण लब्धये ||

आचार्य श्री उमास्वामींच्या तत्त्वार्थसूत्रातून हे मंगलाचरण उपलब्ध आहे. यात खऱ्या देवाचे, आप्ताचे स्वरूप अत्यंत मोजक्या विशेषणांनी सूचित केले आहे. आचार्य श्री समंतभद्र हे आ. उमास्वामींचे (दुसरे शतक ) परमश्रेष्ठ शिष्य होते. ते अनेक भाषाविद्, न्यायशास्त्राचे मेरुमणी, उत्तुंग प्रतिभा विलासाचे धनी व जिनवाणीचे साक्षात् सुपुत्र होते. त्याकाळी जे विविध वैचारिक, तात्त्विक, सामाजिक विचारांचे प्रवाह भारतात प्रचलित होते, त्यांचा आपल्या तर्कनिष्ठ स्यात्पदांकित अनेकान्तिक व सर्व सापेक्ष विचारांच्या सुसंगतीने खंडन- मंडन व आलोडन केले आहे. इतकी नवनवोन्मेष शालिनी प्रज्ञा त्यांच्या ठायी होती की तेथे अंधश्रध्देला, पाखंडाच्या आश्रयाला जागाच उरत नाही. त्यांची प्रज्ञा विश्वरूपाला सम्यक्पणाने जाणणारी, ग्रासणारी व अमृतमय शब्दांनी तत्त्वस्वरूपाचे हार्द प्रगट करणारी होती.

त्यांच्या संबंधाने अनेक थोर थोर आचार्यांनी जे अभिप्राय व्यक्त केले तेही पाहाणे आवश्यक आहे.

(१) आचार्य विद्यानंद यांनी देवागम (अप्तमीमांसा) या छोट्या, केवळ ११४ कारिका (श्लोक) असलेल्या ग्रंथावर आठ हजार श्लोकांची रचना करून त्या छोट्याशा ग्रंथाचे महात्म्यच जणू प्रगट केले आहे. त्यांनी स्वत:अष्ट सहस्त्रीला कष्टसहस्त्री म्हटले आहे. परंतु माझ्या अल्पमते ती स्पष्ट - सहस्त्री किंवा इष्ट - सहस्त्रीच आहे. तसेच आचार्य श्री अकलंकदेवांनी देवागमावर आठशे श्लोकांची अष्टशती नावाचा ग्रंथ लिहिला आहे.

(२) षट्‌खंडागमकार श्री वीरनसेनांनी जिनवाणी सरस्वतीच्या कंठातील निर्मळ मोत्यांचा हार जणू असे या ग्रंथासंबंधी म्हटले आहे.

(३) आचार्य पूज्यपादांनी आपल्या सर्वार्थ सिध्दी या श्री तत्त्वार्थ सूत्राच्या टीका ग्रंथातून आचार्य श्री समंतभद्रांच्या अनेक कारिकांचा उपयोग करून घेऊन आपले विवेचन केले असल्याचे दिसते. उदा. कारिका क्रमांक ३५, ३७, ५६, ७१, ७२, १०२, १०८, यांचेशी साधर्म्य त्यांच्या सूत्र टीकेतील ५/३७/५/३१ ५/३२, ५/४२, १/१०, १/२२ यात अनुक्रमाने संदर्भ दिसून येतो.

स्वामी पात्रकेसरी हे ब्राह्मण कुळातील श्रेष्ठ विद्वान. आप्त-मीमांसा वाचून जैनत्वाची दीक्षा त्यांनी घेतली. त्यांनी पात्र-केसरी स्तोत्र हा ग्रंथ लिहिला.

या ग्रंथातील आशय - गहनता, गूढता व सुस्पष्ट तार्किक विवेचन पाहून फारसे कुणी या ग्रंथाच्या वाटेला गेलेले दिसून येत नाही.

श्वेतांबर आचार्य व संशोधक श्री यशोविजयजी यांनी असे म्हटले आहे की हा ग्रंथ केवळ ११४ श्लोकांचा असला तरी त्यातील वस्तूस्वरूपाचे तार्किक विवेचन, मांडणी, रचना खूपच रहस्यमय आहे. हजारो श्लोक लिहूनही या ग्रंथातील रहस्ये अद्यापि अनाकलनीयच राहिली आहेत. असेच मत पंडित जुगलकिशोर मुख्तार यांनीही व्यक्त केले आहे. पाश्चिमात्य पंडितांनी देखील या ग्रंथाची थोरवी गायली आहे. एखाद्या विषयाचे सूक्ष्म अध्ययन, मांडणी, रचना, अभिव्यक्ती इतक्या उत्कटपणाने करणारा हा ग्रंथ अपूर्व होय, असे त्यांचे मत आहे.

देवागम स्तोत्र : आप्तमीमांसा -

अत्यंत क्लिष्ट समजला जाणारा ग्रंथ आम्ही सोप्या, सुबोध, सुस्पष्ट व रसवान रीतीने संपादित केला आहे, ते यासाठी की आमच्या सामान्य वाचकांनाही आचार्यांचे विचार, जे, या परिवर्तनवादी, सर्वधर्म - समभाववादी, ऐहिक- पारमार्थिकवादी, व्यवहार-निश्चवादी, अशा विविध वादात अडकलेले आहेत, त्यांना कळावेत म्हणून. एखाद्या घागरीत जगातील सर्व महासागरांचे पाणी समाविष्ट करण्याचा हा प्रयत्न आहे. जैन तत्त्वज्ञान, जैन संस्कृती, परंपरा व संस्कार यांचा अद्‌भूत चमत्कारमय रस रसिकांना चाखता यावा, हा हेतू आहे.

देवागम हे एक सुंदर भक्तीमय काव्य आहे. देवागम या शब्दाने ते सुरू होते म्हणून त्या ग्रंथाला देवागम - स्तोत्र असे म्हणतात. अनेक जैन स्तोत्रे याच पध्दतीने ओळखली जातात. जसे, स्वयंभू स्तोत्र, भक्तामर स्तोत्र इ. या ग्रंथाचे खरे प्रयोजन, अरिहंत देवाचे श्रेष्ठत्व, पाप - नाशकत्व, उपदेशकत्व व सर्वज्ञत्व सिध्द करणे हे आहे. पण ते सिध्द करताना तार्किकपणे, वैज्ञानिक रीतीने, अविरोधी मांडाणीने करणे महत्वाचे आहे. अज्ञान तिमिराने माणूस जितका अंध होतो, मोह ग्रस्त होतो, क्रोधादिक विकारांनी लिप्त होतो तितका तो अन्य कशानेही होत नाही. म्हणून मानवी मनाचे उन्नयन करताना त्याची दृष्टी स्वच्छ, निर्मळ, विवेकी व प्रज्ञावान् करणे हेच महत्वाचे कार्य असते. मानवी मन सतत प्राप्य, विकार्य व निवृर्त्य अशा तिहेरी चक्रात भ्रमत

राहाते. मानवाचे मन विकारांना प्राप्त होते. काही काळ विकारी राहाते व मग त्यातून ते काही काळ विश्रांत होते. मनाचे हे चक्र म्हणजे आजहच्या कान्शस्नेस्, सब-कॉन्शस् नेस्, सुपरकॉन्शस्नेस्, वैज्ञानिक पध्दतीने स्पष्ट केले जात आहे. मानवी मन हे भय, आशा, स्नेह व लोभ यामुळे वैज्ञानिक दृष्टीकोण सोडून मिथ्या, भ्रष्ट व अनीतीच्या गर्तेत सापडते. या ग्रंथांत देवाचा शोध घेणे व खरा देव कोणता, खर अगम कोणते. खरी सुखमय जीवनपध्दती व आचारपध्दती कोणती यासंबंधीच्या अनेक विचार प्रवाहांचा विचार तार्क्किपणे केला आहे.

तसे करताना आचार्यांनी सर्व प्रकाराच्या विरोधी प्रतिपक्षांचाही समाचार घेतला आहे. त्यावेळी जनमानसात अनेक भ्रांती होत्या. अंधश्रध्दा होत्या. गतानुगतिकता होती. आजही आमच्या समाजाची तीच स्थिती आहे. भारतीय संस्कृतीचे जे स्वच्छ, निर्मळ, प्रगतीवादी व जनसामान्यांच्या मनात विवेक व प्रज्ञा यांची जी महत्ता होती, ती आज मलीन झाली आहे. आत्मस्वातंत्र्याचा, आत्मोन्मुखतेचा, आत्मसन्मानांचा लोप होत आहे. अनंत शक्तीमान आत्मशक्ती पराधीन, परावलंबी व भिकारी झाली आहे. अनेक वाद देशात निर्माण झाले आहेत. अत्याचार, अनाचार, भ्रष्टाचार व अनैतिकता वाढत आहेत. पाखंडी विचारांनी देशातील जनता त्रस्त आहे. सम्यक्‌दिशा देऊ शकणारे नेतृत्त्व लोप पावले आहे.

अशा विषम स्थितीत आ. श्री. समंतभद्रांचे अनेकान्तात्मक विचार आजही चांगले मार्गदर्शन करू शकते. श्रध्दाहीन किंवा कुश्रध्द समाज हा नेहमीच गुलाम होत असतो. आ. श्री. समंतभद्र हे श्रेष्ठतम दार्शनिक आहेत. ‘ याथातथ्यं विनाच विपरीतात् ’ असे त्यांचे स्पष्ट कथन आहे.

या छोट्याशा स्तुतीत त्यांनी देव, शास्त्र, गुरू यांचे निर्मळ स्वरूप कसे आहे याचे स्पष्ट दिग्दर्शन केले आहे. खरा देव तोच जो निर्दोष आहे, निर्लोभी, भयमुक्त आहे, खऱ्या मोक्षमार्गाचा, मुक्तीचा विचार जो स्पष्टपणे सांगतो, क्रोध, अहंकार, कपट, लोभ या चार कषायापासून जो मुक्त आहे, तो खरा देव होय. असा देव केवळ श्री जिनेंद्रच होय. तो देव जितेंद्रिय आहे, सर्वज्ञ आहे, आत्मज्ञ आहे. समाजाला पाखंडी देवदेवतांच्या संकल्पनातून मुक्त करून एक आत्मसापेक्ष विचार ते या ग्रंथातून देत आहेत. मतामतांच्या देवविषयक व धर्मविषयक विचार-कल्पनांनी ग्रंस्त मानवी मनाला मुक्त करून सम्यक् देव, शास्त्र व गुरु यांची सुंदर, तर्कबध्द मांडणी ते या ग्रंथातून करतात.

भक्तीतून तत्त्व निरूपण -

खरा देव कोणता, याची चर्चा करताना आचार्यश्री समंतभद्र यांनी अर्हंताच्या उपदेशातील सार्थकता, प्रामाण्य व वस्तू स्वरू पाचे याथातथ्य (खरे) वैज्ञानिक तर्क- सुसंगतपणे मांडले आहे. जैन दर्शनातील महत्वाचा विषय म्हणजे स्याद्‌वाद हा आहे.

“ स्याद्‌वादो हि समस्त वस्तु - तत्त्व - साधकं

एव एकं- अस्खलितं शासन अर्हत् - सर्वज्ञस्य ”

हे सूत्र मनात ठेवून त्यांनी - हे अर्हत् प्रभू, तुझेच शासन, तुझीच धर्मप्रभावक प्रभावना ही जगात श्रेष्ठतम आहे, असे सांगून तूच वंदनीय आहेस, म्हणून मी तुला भक्तीने वंदन करतो, असा शेवटी निर्वाळा दिला आहे.

आपले आज जे ज्ञान आहे, त्यात अनेक भ्रांती आहेत. त्याचे कारण आपला राग - द्वेष व अज्ञान हेच आहे. त्यातून मुक्त होऊन परमात्म्याचे व त्याच्या गुणांचे संकीर्तन यात आहे. मिथ्यात्व - ग्रस्त चेतन शक्ती ही सत्य -स्वरूप जाणू शकत नाही.

यासाठी आचार्यांनी प्रमाण व नय याचीही मोठी सुंदर मांडणी करून भक्तांच्या मनातील संशय, भ्रांती व अनेक देवदेवतांच्या उपासनेतील उणीवा दाखवून दिल्या आहेत. शुध्द, स्वच्छ व निखळ विश्व - स्वरूपाचे वर्णन करून आत्मा - परमात्माच कसा उपासनीय आहे, हे सप्रमाण दाखवून दिले आहे.

थोडक्यात, या ग्रंथात सहा प्रकाराने तत्त्वज्ञानात्मक चर्चा आहे - (१) सर्वज्ञत्व (२) प्रमाण (३) नय (४) अनेकान्त (५) स्याद्‌वाद (६) सप्तभंगी. आचार्य स्वत: अत्यंत तर्क- कठोर असल्याने कोणतेही वचन (विधान) ते हेतू (कारण) असल्याशिवाय स्वीकारत नाहीत.

हेतुमत् वचनं यस्य, तस्य कार्य परिग्रहः |

हे त्यांच्या सर्व दार्शनिक विवेचनाचे सूत्र आहे. आजचे विज्ञानही हे सूत्र वापरत आहे. आजची न्यायव्यवस्था व आपली राजकीय घटना, लोकशाही व्यवस्था या साऱ्या सामाजिक जीवनाशी संबंधित असणाऱ्या संस्था देखील आचार्यांनी निर्दिष्ट केलेल्या विविध प्रकारच्या म्हणजे प्रमाण व नय यांनी आविष्ट आहेत. साहित्य, काव्य, नाटक इ. सर्व ललित कृतीही अशाच हेतूमत्‌शी संबंधित आहेत.

हा ग्रंथ देव व भक्त यांचे नाते कसे असावे, भक्ताने देवाचे बाह्यस्वरूप म्हणजे त्यांचे मुख - सौंदर्य, त्याच्या शरीराची शोभा, बाह्य रीतीने सजविलेले त्याचे देवालय इ. गोष्टींची भक्ताने केलेली स्तुती ही महत्वाची नाही. ते सर्व अचेतन वैभव आहे. त्या अचेतन वैभवाचा परमात्मस्वरूप देवाशी काही संबंध नाही. ती भक्ताने आपल्या परीने केलेला देवाचा सत्कार होय. रत्न, हिरे, माणके किंवा छत्रचामर वगैरे, किंवा स्वर्गीय देवादिकांचे येणे-जाणे, त्यांचेकडून भगवंताची प्रार्थना, स्तुती, पूजा इ. गोष्टीपेक्षा 'वंदे तत् गुण-लब्धये' यावरच लक्ष केंद्रित केले पाहिजे. दुसरे, आज अरिहत प्रभूंचे अस्तित्व दृष्टीसमोर प्रत्यक्ष नाही. पण परोक्षरीतीने दगडात त्यांच्या गुणांची कल्पना करून त्या गुणांचे संस्थापन, स्तवन, पूजन, अर्चन, आरती वगैरे करणे हेही आवश्यक आहे. स्वभाव स्वरूप असलेले अनंत ज्ञान-दर्शन, सुख, वीर्य या गुणांचीच, ते गुण आपल्याही आत्म्यात प्रगट व्हावेत, म्हणून पाषाणात विधीपूर्वक संस्थापित खऱ्या वीतरागी, विज्ञानमय, सर्वज्ञ अशा देवाची पूजा केली पाहिजे. भक्ताने भिकाऱ्याची भूमिका किंवा पुण्य प्राप्तीची अभिलाषा न बाळगता खऱ्या भक्ताची भूमिका स्वीकारली पाहिजे.

स्वामी श्री समंतभद्र आचार्यांच्या अन्य साहित्यकृती अशा -
(१) जिनशतक (स्तुती-विद्या) (२) युक्त्यनशासन (वीरजिन - स्तोत्र ) (३) श्री स्वयंभू स्तोत्र (४) रत्नकरंड श्रावकाचार.

तत्वचिंतक व महान लेखक-

प्रा. सुमेरचंद जैन यांनी हे देवागम स्तोत्र हृदयंगम करू न त्यातील सारभूत आशय अत्यंत सोप्या, सुबोध, रसाह व कुठेही आगमाला किंवा आचार्यांच्या विचारांचा अधिक्षेप न करता प्रवचनाच्या रू पाने हा ग्रंथ सिध्द केला आहे. हा ग्रंथ आम्ही आमच्या परीने चर्चा करू न संपादनास सहाय्य केले आहे. हा ग्रंथ प्रकाशित व्हावा म्हणून प्रा. श्री. सुमेरचंद यांची वात्सल्यमयी हार्दिक भावना जाणून आम्ही 'अभ्युदय ट्रस्ट ' या संस्थेच्या मान्यवर सदस्यांच्या प्रेमपूर्ण सहकार्याने प्रकाशित करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे हा सोपा, सुबोध, प्रामाणिक स्वरूपाचा ग्रंथ लोकार्पण करीत आहोत. त्या ग्रंथाच्या वाचनाने सर्व वाचकांची प्रज्ञा जागृत होवो, ही आमची भावना आहे.

## आत्मसाधनेसाठी तेवत राहाणारा नंदादीप
## प. पू. आर्यिका चंद्रमती माताजी

पूज्यश्री आर्यिका चंद्रमती माताजी या काळाच्या पडद्याआड जाऊन २५ वर्षाहून अधिक काळ लोटला. सदैव आत्मरतीच्या आनंदमय डोहात रमणारे, स्व- पर कल्याणासाठी अखंडपणे व्रताचरण, तप, संयम व परोकार करणारे एक तेजस्वी स्त्री- रत्न म्हणून आदरास पात्र राहणारा त्यांचा आत्मा आज केवळ स्मृतीरू पातच विद्यमान आहे.

श्राविकाश्रमाच्या व्रती, ज्ञानी, विशकतज्ञ व संपूर्ण जीवन स्त्री - शिक्षणसाठी वेचणाऱ्या आदरणीय सुश्री ब्र. विद्युल्लता शहा यांच्या रूपाने त्या आजही विद्यमान आहेत. जैन समाजाला ज्या स्त्रीने आपले सर्वस्व अर्पण केले, शिक्षणातून धर्मसंस्कार व जीवन जगण्याची उत्तम कला शिकविली, सदैव धर्मग्रंथांच्या स्वाध्यायाची, संयमित जीवनाची प्रेरणा दिली त्या भगिनी ब्र. विद्युल्लता शहाच्या रू पाने त्यांच्या मातोश्री आर्यिका चंद्रमतीजी आजही खऱ्या अर्थाने विद्यमान आहेत.

### पू. आर्यिका चंद्रमती माताजींचा परिचय -

पूर्वीच्या फलटण संस्थानातील गिरवी या गावातील धर्मनिष्ठ श्री फुलचंद व सौ. कस्तुरबाई यांच्या समृध्द घरात एक कन्यारत्न जन्मले. आई - वडिलांनी त्या सुंदर, रूपसंपन्न कन्यकेचे नाव चंपा ठेवले. चाफ्याची मोहकता, सुवासिकता व कोमलता जणु चंपा या कन्येच्या ठायी होती. त्यावेळी खेडोपाडी शिक्षणाचा प्रचार नव्हता, तरी जैन कुळात अल्पसे शिक्षण मुलींना देण्यात येत असे. चतुर चंपेने मात्र स्व- बळावर अध्ययन केले. लिहिण्या - वाचण्याइतके ज्ञान तिला मिळाले. धार्मिक पुस्तके वाचणे, पूजा - अर्चा, अभिषेक यात भाग घेणे यात तिचे मन रमू लागले. बालपणापासून ती स्वतंत्र विचाराची होती. मनाने जे ठरविले ते पार पाडण्याची हिम्मत व धैर्य तिच्याकडे होते. दिसायला ती अत्यंत गोरीपान, आकर्षक, मनमिळावू व कष्टाळू होती. वयात आल्यावर आई - वडीलांनी तिच्या लग्नाचा विचार सुरू केला.

विवाह -

मोहोळ येथील शेठ श्री मोतीरामजी भवानचंद शहा यांच्या कनिष्ठ पुत्राशी - श्री हिराचंदशी त्यांचा विवाह करण्यात आला. दोन्ही घराणी धार्मिक व व्रताचरणी होती, संपन्न होती. नव्या घरात, नव्यास वातावरणात चंपा रमू लागली. सासरचे लोकांनी तिचे नाव माणिकबाई ठेवले. सौ. माणिकबाईंनी आपल्या मृदु - मधुर लाघवी सेवावृत्तीने सासरची मर्जी संपादित केली. स्वच्छता, टापटीप, सुगणीसारख स्वयंपाक, जैन सण, उत्सव साजरे करण्याची हौस, सासू-सासऱ्यांची मान राखणे व सदैव हसत मुखाने आनंदित राहाणे यामुळे मोहोळ गावची मंडळी देखील तिच्या आदराला पात्र झाली.

लवकरच सौ. माणिकबाई या गर्भवती झाल्या. डोहाळेही लागले. सासर - माहेरच्या लोकांना खूप आनंद  झाला. सौ. माणिकबाई मनोमन सुखावल्या. नऊ महिने पूर्ण झाल्यावर त्यांना कन्यारत्न प्राप्त झाले. ते कन्यारत्न म्हणजेच सुश्री विद्युल्लता शहा होत. आईने तिचे नाव सुमन ठेवले.

पण हा सुखाचा संसारही क्षणभंगुरच ठरला. कॉलऱ्याच्या साथीने सर्व गाव बेजार झाले आणि त्या आजारातच श्रीमान हिराचंदजी स्वर्गवासी झाले. पति - वियोगाचे अत्यंत पीडादायक दु:ख सौ. माणिकबाईना सहन करावे लागले. भरल्या संसारातील सारी सुखे क्षणात अंतर्धान पावली. त्याकाळी वैधव्या म्हणजे एक कठोर शिक्षाच होती. नियतीचा घाला सौ. माणिकबाई यांचेवर पडला. त्या एकाकी झाल्या. एक सुंदर कन्या कुमारी सुमन ( विद्युल्लता ) हीच त्यांना आधार ठरली.

सुश्री माणिकबाईंनी त्याही भयावह परिस्थितीत स्वत:ला सावरले. पुढे काय करावे, कुठे राहावे, याचा विचार त्या करीत राहित्या. मुळातूनच धर्माचे उत्तम संस्कार असल्याने त्यांनी धैर्याने ते अनावर दु:ख गिळ्ले खरे, पण आता पुढील आयुष्य कसे घालवावे, काय करावे जेणे करू न हे स्त्रीत्वाचे बंधन तोडून उत्तम जीवन धर्ममय, अनंत सुख - स्वानंदमय रीतीने घालविता येईल हा विचार मनातून प्रबळ झाला. गृहस्थ जीवनातील न॥वरता, चांचल्य, क्षणिकता त्यांना कळून आली.

आत्मतत्त्व हे उदात्त उन्नत

जाण तयाला उघडी नयन तू ||

अशी प्रेरणा तिच्या मनात उद्‌भवली. आपले जीवन आता धर्म - संस्कारांनी, धर्माचरणाने पुनीत करावे, साधु - संतांच्या पावन, मंगलमय संगतीत घालवावे, जिनवाणीचे आकंठ प्राशन करावे, चैतन्याच्या शा।।वत प्रवाहात आकंठ सुस्नान व्हावे, जीवनाला धर्माचरणाने पावन करावे, अशी तीव्रतर भावना तिच्या मनात दृढ झाली.

संतांच्या सहवासात -

कारंजा (विदर्भ) या धर्मनगरीत ब्र. श्री. देवचंद शहा (नंतरचे मुनी श्री. समंतभद्र महाराज) यांनी महावीर ब्रह्मचर्याश्रमाची स्थापना केली होती. त्याच गावात स्त्रियांचेसाठी सर्व सुखसोयींनी उपयुक्त असे श्राविकाश्रमही होते. अनेक विधवा, अनाथ श्राविका त्या आश्रमात राहून धर्मसाधना करीत होत्या. सुदैवाने महावीर ब्रह्मचर्याश्रमात श्री. प्रेमचंद हे परिचित गृहस्थ व मोहोळचे मणिकबाईचे नातेवाईक मुनीम म्हणून काम करीत होते. त्यांच्या आग्रहाखातर कारंजाला जाण्याचा बेत ठरला. सोबत कन्यारत्न कु. सुमन (विद्युल्लता) हिलाही नेणे क्रमप्राप्त होते. सुश्री माणिक बाई आपल्या एकुलत्या एक कन्येला घेऊन कारंज्याला आल्या. श्री. प्रेमचंद्रजी मुनीम यांनी त्यांना अत्यंत प्रेमाने ठेऊन घेतले.

आचार्य श्री शांतीसागरजींचे पट्टाधीश शिष्य प. पू. आ. वीरसागर महाराजांचा त्यावर्षी चातुर्मास कारंज्याला होता. नित्य होणाऱ्या प्रवचन - श्रवण यामुळे वैराग्याची भावना जागृत झ ााली. त्यांनी महाराजाकडून सातवी ब्रम्हचय्र प्रतिमा स्वीकारली. ब्रम्हचर्य व्रताचे दृढतेने पालन करण्याचा निर्धार केला. कारंजेकारांनी या त्यांच्या निर्णयाचे जोरदार स्वागत केले.

क्षुल्लिका पदाची स्वीकृती -

निरतिचारपणे व्रतांचे आचरण करीत असता मनातून क्षुल्लिकापद स्वीकारावे अशी भावना दृढ होत गेली. सुदैवाने श्री सिध्दक्षेत्र कुंथलगिरी येथे आचार्य श्री शांतिसागर महाराजांनी सल्लेखनाव्रत घेतले होते. जैन समाजाला अत्यंत आदरणीय असे ते व्यक्तिमत्व होते. आपल्या निरतिचार शुध्द आचरणाने ते सर्वांना वंद्य होते. मुनी परंपरेला एक नवे तेज, नवा आदर्श दिला. त्यांनी आपल्या प्रथम शिष्य मुनीश्री वीरसागरजींना प्रथम पट्टीधीशपदी नेमले. मुनीश्रीं वीरसागर हे जयपूर येथे होते. म्हणून ब्रह्मचारी सूरजमल यांना पिच्छी व आदेश देऊन जयपूरला पाठविले.

त्यांच्यासोबत पूज्य माणिकबाई यांना जयपूरला पाठविले. जयपूरला गेल्यावर प्रथम पट्टाधीश आचार्य श्री वीरसासागरजी महाराज यांच्याकडून सुश्री माणिकबाई यानी हजारो लोकांच्या समक्ष क्षुल्लिकापदाची दीक्षा घेतली.

पुढे आचार्य श्री वीरसागरजी महाराज संघासह तीर्थयात्रा करीत करीत सिध्दक्षेत्र गिरनार येथे आले. त्या ठिकाणी हजारो लोकांच्या उपस्थितीत पूज्य क्षुल्लिका माणिकबाई यांनी सर्वश्रेष्ठ अशी आर्यिका पदाची दीक्षा घेऊन स्वत:ला पावन करू मन घेतले. त्यावेळी त्यांचे नाव चंद्रमती माताजी असे ठेवण्यात आले.

रोज आचार्यांचे वंदन, पूजन, उपदेश-श्रवण, स्वाध्याय, सामायिक व ध्यान यांतच त्यांचा वेळ जात असे. २०-२५ आर्यिका व १०-१५ मुनी क्षुल्लक-क्षुल्लिका असा चतुर्विध संघ राजस्थानात धर्मजागृती करीत होता. अत्यंत कठीण असे हे पद त्यांनी काटेकोरपणाने, अतिचाररहित रीतीने सांभाळले. त्याकाळात त्यांनी संघात राहून अनेक ग्रंथांचे वाचन, स्वाध्याय केला. ज्ञानाची व व्रत - संयमाची दारे खुली झालीत.

आत्मा प्रभावनीय :

या तत्त्वाप्रमाणे त्यांनी कठोरपणे रत्नत्रयाची साधना केली. ‘आत्मोन्मुखं प्रकाशमानं ज्ञानं एकं आलंबव्यं ’ या गुरूंच्या उपदेशाने त्यांनी सतत आपले तन-मन केवळ आत्मशुध्दीसाठीच तयार केले. सर्व परिषह सहन करीत राहिल्या.

मनातील एक साधना-पथातील अत्युच्च क्षण त्यांच्या जीवनात आला. तेथे त्यांचे मानसपुत्र श्रीमान सूरजमलजी होते. द्वितीय पट्टाधीश प. पू. आचार्य श्री शिवसागरजी आपल्या विशाल संघासह विराजमान होते. त्यांचा विहार गिरनार या भ. नेमिनाथांच्या निर्वाणभूमीकडे संघाबरोबर झाला. धर्मप्रभावना करीत संघाचा विहार होत होता. गावोगावी प्रचंड उत्साहाने स्वागत होत होते. संघपती होते श्रावक शिरोमणी श्रीमंत हिरालालजी. संघ निवाई या गावी प. पू. चंद्रमती अम्मांनी कडक / तपस्विनी आर्यिका म्हणून त्यांचा गौरव करण्यात आला. जीवन धन्य झाले. पाच महाव्रतांचे पालन व सततच्या स्वाध्याय मनन व चिंतन करू न आचार्यश्रींच्या छत्राखाली राहूनच त्यांनी आर्यिका पदाची शान वाढविली.

कन्येचा, कु. विद्युल्लता शहा यांचाही प्रश्न सुटला होता. सोलापुरातील महान शिक्षण कार्यातील सर्वश्रेष्ठ श्राविकाश्रमच्या संचालिका पंडिता सुमतिबाई यांनी कु. विद्युल्लतेला स्वत:ची मानस कन्यारूपाने स्वीकार केला. कु. विद्युल्लतेच्या जीवनाला एक नवे वळण मिळाले. या संधीचा त्यांनी पूरेपूर उपयोग केला. बी.ए.बी.टी. पर्यंतचे लौकिक शिक्षण पूर्ण केले. पं. सुमतिबाई यांच्या सहवासात राहून जैनधर्माच्या अनेक ग्रंथांचे सूक्ष्म अध्ययन केले. आश्रमातील सर्व कार्यात स्वत:ला पूर्णपणे झोकून दिले. उमा प्रशालेच्या मुख्याध्यापिकेचे पद यशस्वीपणे भूषविले. अनेक परित्यक्ता, विधवा व किंकर्तव्यमूढ झालेल्या स्त्रियांच्या जीवनात नवा उत्साह त्यांनी निर्माण केला. त्याचे जीवन पुन: आनंदाने फुलविले.

आश्रमात अनेक सामाजिक, राजकीय, धार्मिक थोर पुरुष येत. मुनीवर्य, आर्यिका यांचे संघ येत. त्या सर्वांच्या आहार-विहाराची व्यवस्था त्या पाहात. त्या पं. सुमतिबाईच्या सावली होऊन राहिल्या. संस्थेच्या विविध शाखांचा विकास त्यांच्या देखरेखीखाली होत राहिला. पण त्या सतत प्रसिध्दीपासून दूर राहिल्या.

प. पू. आर्यिका चंद्रमतींनी समाजाला हे स्त्री-सत्न अर्पण केले. ही त्यांच्या जीवनातील महत्वाची घटना आहे. एक: चंद्र: तमो हंति न च तारागणोऽपि च । एकच चंद्र अंध:काराचा नाश करतो, तेथे अनेक तारकांच्या अनेक समूहांचे काय काम ?

आत्मसाधक आर्यिका चंद्रमतीजी -

आर्यिकापदाला दोष लागेल, जनापवाद होईल याबाबत त्या अत्यंत दक्ष होत्या. आत्मा हाच खरा उपास्य आहे, वंदनीय आहे या पावन श्रेध्देन त्यांनी आपले जीवनाचे सारे क्षण वेचले. निर्मलतेने क्रोधादि विकारांची सल्लेखना करीत राहिल्या. मान - मरातब, पूजा यांचा कधीही स्पर्श होऊ दिला नाही. स्वच्छ निर्मळ आचार- विचारांनी त्यांनी रत्नत्रयाची सातत्याने आराधना केली. आचार्य श्री शांतिसागर महाराजांच्याबद्दल त्यांची श्रध्दा, भक्ती अनन्य साधारण होती. रोज त्या गुरूदेवांच्या नावाचे १०८ जाप्य देत असत. त्यांच्याच उपदेशाने स्वत:चे जीवन त्यांनी घडविले. ‘श्रध्दानं परमार्थानां’ या तत्वावर अटूट श्रध्दा ठेवून परमार्थ म्हणजे आत्मा, विशुध्दतम आत्माच होय याची सतत जाण त्यांनी ठेवली.

अनाद्यनंतं अचलं स्व - संवेद्यमिदं स्फुटं |

जीव: स्वयं तु चेतन्यं उच्चै: चकचकायते ||

अशाप्रकारे आत्म स्वरू पाचे चिंतन सतत केल्याने त्यांनी निर्दोष चारित्र्य प्राप्त केले.

समाधि मरणाचा सोहळा -

ध्यानाने, तपाने, कर्मक्षयाने जीवन कंठित असता शरीर अत्यंत कृश झाले होते. त्या आचार्यकल्प १०८ श्रुतसागरजींच्या संघात होत्या. तो अनेक मुनी, साधु - साध्वींचा विशाल संघ होता. पूज्य महाराजांनी त्यांना सल्लेखनेचे व्रत ज्येष्ठ आर्यिका विशुध्दमतीजी व इतर चतुर्विध संघाने भावभक्तिपूर्वक दिले.

सर्व संसारी जीवांना मरणाचे वरदान असते. परंतु मरण समयी अत्यंत शांत, निर्भय, निर्मम राहून धर्म - ध्यान पूर्वक देह त्यागणे कठीण असते. आर्यिका प. पू. चंद्रमती माताजींनी तेही व्रत आचार्यांच्या सान्निध्यात घेतले. राजस्थानातील ऐतिहासिक नगरी टोक या गावी त्यांना ‘ ओम णमो अरिहंताणं ’ म्हणत देह ठेवला. तो मंगल, पावन दिवस होता. ३० एप्रिल १९७४ ( चैत्र शुध्द नवमीचा ) एका आदर्श तपस्विनीचे जीवन टोंक येथील नशियात विश्रांत झाले. संसारी जीवनाचा तो अखेरचा नि॥वास होता. चंपाकळी चे पुष्प पूर्णत: विकसित, सुरभित होऊन जिनधर्माच्या आराधनेत अर्पित झाले.

एका आत्मज्ञ, धर्मज्ञ जीवाला आत्म्याचाच आश्रय असतो. त्या आश्रयातच सामावून जाण्याची असाध्य कला प. पू. चंद्रमती माताजींची तपाने, ध्यानाने साध्य केली होती.

इ. स. १९७४ हे वर्ष भ. महावीरांच्या निर्वाण महोत्सवाचे वर्ष म्हणून सर्व शासकीय पातळीवरू न साजरे केले जात होते. त्या पावन वर्षातच माताजींनी आपले निर्याण साधले. आज या वर्षी भ. महावीरांचा जन्मोत्सव केंद्र व राज्य शासन देशभर साजरा करीत आहे. पंचवीस वर्षे माताजींच्या निर्याणाला होत आहेत. त्यांच्या परम पावन, मंगलमय स्मृतीच्या निमित्ताने ‘ शोध - देवत्वाचा ’ हा ग्रंथ पूज्य सुश्री विद्युल्लता शहा यांच्या प्रायोजकत्वाने व अभ्युदय ट्रस्टच्या सर्व वि॥वस्तांच्या वतीने प्रकाशित करण्याचा शुभ - मंगळ योग येत आहे. पू. माताजींची पुतणी सुश्री

केशरबाई शिवलाल शहा यांच्या निधनानंतर त्यांच्या सर्व इस्टेटीचा एक धर्मादाय ट्रस्ट स्थापन केला गेला आहे.

अभ्युदय चॅरिटेबल ट्रस्टचे महनीय कार्य -

पंडिता सुश्री विद्युल्लता शहा यांच्या अधिनेतृत्वात व अध्यक्षतेखाली हा ट्रस्ट स्थापन केला. त्यात श्री. गिरीष शहा, श्री. अतुल शहा हे विश्वस्त आहेत. ट्रस्टची सरकारी नोंदणी करण्यात आली. त्या न्यासामार्फत्त प्राचीन जैन साहित्य संशोधन, प्रकाशन करणे, गरीब- गरजु स्त्रियांना, विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप देणे, औषधोपचारासाठी सहाय्यता करेण इ. परोपरकारी कार्ये करण्यात येत आहेत. मानवी जीवनात धर्म, दान, संस्कार, विद्याभ्यास या गोष्टी महत्वाच्या आहेत. या न्यासाने उत्तम कार्य आजवर केले आहे. आम्ही सर्व विश्वस्तांना धन्यवाद देत आहोत.

‘शोध-देवत्वाचा’ हा आप्तमीमांसा (देवागम - स्तोत्र ) या अत्यंत दुरूह, कठीण अशा महत्वाच्या ग्रंथाचा आश्रय घेऊन सोपा, सुबोध, रसाळ भाषेत लिहिला आहे. पंडिता सुश्री विद्युल्लता शहा यांच्या प्रेरणेमुळेच हा ग्रंथ आम्ही लिहिला. त्यांनी हा ग्रंथ वाचून आपला उत्तम अभिप्राय दिला. इतकेच्च नव्हे तर अभ्युदय ट्रस्ट, सोलापूर या संस्थेच्या मार्फत्त रु. १५ हजारांची राशी दान म्हणून प्रेमभावाने पात्र आहे. आम्ही त्यांचे व विश्वस्तांचे ऋणी आहोत. त्यांचे जीवन सुखमय, आनंदमय व आरोग्यमय व्हावे ही अरिहंत चरणी प्रार्थना करीत आहोत.

शोध देवत्वाचा

या अमूल्य ग्रंथरत्नाच्या प्रकाशनासाठी योगदान देणारे -

समाजभूषण, जिनवाणी प्रभावक, उद्योगपती

श्रीमंत शेठ रतनचंदजी माणिकचंदजी मेहता, नाशिक.

आमचे परम आदरणीय मित्रवर्य श्रीमान शेठ रतनचंदजी मा. मेहता, नाशिक यांनी सातत्याने आमच्या जिनवाणी - प्रचार कार्याला उत्तम दानाने समृध्द केले आहे. गेल्या वर्षी ‘कैवल्य वल्लरींची फुले ’ या ग्रंथासाठी त्यांनी रु.दहा हजाराचे दान दिले होते. सौ. लीलावती जैन या आजारी आहेत हे कळाल्यावर त्यांच्या उपचारासाठी त्यांनी रु. २०००/- चे आर्थिक

सहाय्य दिले होते आणि आता या नव्या ग्रंथासाठी त्यांनी रु. २,५०१/- देऊन अत्यंत प्रेमाने सहृदयतेने मदत केली आहे.

आपले जीवन त्यांनी चार प्रकारच्या दान संस्कतीने अलंकृत केले आहे. जवळ जवळ दहा - पंधरा लाखांचे दान त्यांनी व त्यांच्या स्व. धर्मपत्नी सौ. रत्नप्रभादेवी ( निर्याण - १-६-१९९६ ) यांनी विविध क्षेत्री दिले आहे.

निमगाव केतकी ( पुणे ) या लहानशा गावात त्यांचा जन्म झाला. तेथेच त्यांचे बालपण व शिक्षण झाले. त्यांच्या कर्तृत्वाला, धाडसाला, साहसाला ते क्षेत्र अपुरे होते. म्हणून रिक्त हस्ताने ते नाशिकला आले. त्यांच्या तेजोमय कर्तृत्वाला आकाश ठेंगणे पडले. कारखानदारी केली. खूप पैसाही त्यात मिळाला. मुला - बाळांना उच्च विद्या विभूषित केले. देशभर प्रवास केला. अनेकांची जीवने

दानशीला, धर्मवत्सला

[ स्व. ] सौ. रत्नप्रभा रतनचंद मेहता

- जन्म : १२-१०-१९२२
- स्वर्गवास : १-६-१९९६

भाग्यशालिनी, कला- धर्म - विज्ञान यांच्यात सदैव रमणाऱ्या सौ. रत्नप्रभा रतनचंद मेहता, नाशिक यांचा वियोग होऊन पाच वर्षाचा काळ लोटला. त्यांच्या ६ व्या पावन, मंगल स्मृती दिनानिमित्त आम्ही आमची श्रध्दासुमने त्यांना अर्पण करीत आहोत.

संपादक

फुलवली. चिकाटी, उत्साह, अभ्यास व साहस यामुळे नाशिक सारख्या परक्या गावात त्यांनी आपल्या कर्तृत्वाने मानाचे स्थान मिळविले. निरागसता, निर्लोभता, साधेपणा व दातृत्व यामुळे त्यांचे जीवन अत्यंत आनंदमय झाले आहे.

आपली पत्नी सौ. रत्नप्रभा यांच्या आजारात अत्यंत मनोभावे सेवा केली. पण तोही आधार नियतीने काढून घेतला. १ जून १९६६ रोजी अर्धांगिनीचा दु:खद वियोग घडला. मन जडावले. परंतु तेही दु:ख पचवून त्यांची ध्यान-समाधी, प्राणायाम, विपश्यना इ. रीतीने एक नवे आध्यात्मिक जीवन प्राप्त केले आहे. स्वाध्यायाने त्यांचे मन परदार्थांच्या पासून अलिप्त, अबध्द होत आहे. समयसारासारख्या अध्यात्म - रसपूर्ण ग्रंथाचे वाचन, मनन, चिंतन सतत करीत राहिल्याने एक विवेकी वैराग्य जागृत झाले आहे. सांसारिक जीवनाला एक आनंदमय, ज्ञानमय वलय त्यांनी प्राप्त करून दिले आहे. त्यातूनच निरासक्तीचे दिव्य सुगंधी कमल उगवले आहे.

आम्ही आमच्या अध्यात्म इ साधक ज्येष्ठ मित्राला उत्तम आरोग्याची, दीर्घायुष्याची कामना करतो. अभिवादन करतो. जीवेत शरदः शतम् |

संपादक

## : १ : देव असा, देव तसा

देवागम नभोयान चामरादि विभूतय: ||

मायाविष्यपि दृश्यिन्ते नातस्त्वमसि नो महान् || १ ||

अर्थ : देवादिकांचे आगमन, आकाश गमन, चामरादिकांद्वारा आदर इत्यादि अद्भूत वाटणाऱ्या चमत्कारामुळे तुम्ही, हे प्रभो, आमचे आत्म, गुरू किंवा पूजनीय व्यक्ती होऊ शकत नाहीत. कारण जादुगिरी करणाऱ्याकडूनही अशा गोष्टींची निर्मिती पाहिली जाते.

स्पष्टार्थ विवेचन : आचार्य श्री समंतभद्र स्वामींनी इ. स. तिसऱ्या शतकात आपल्या दिव्य ग्रंथांनी जैन साहित्यात मोलाची अनुपम भर टाकली आहे. त्यांनी या देवागम स्तोत्रातून कुणाला वंदन करावे, कुणाची स्तुती, पूजा करावी याची मोठी मनोरम पण वैज्ञानिक रीतीने मीमांसा, विवेचन केले आहे.

मानवांना चमत्कार प्रिय असतो. देवांची पूजा करतांना त्याचे अलंकार, त्याचे सुंदर रूप, त्याच्या भोवती केलेली आरास हे पाहून तो मंत्रमुग्ध होतो. हे त्याचे जे आकर्षण आहे, ते काही इ ाानीपणाचे नाही. तो जडात्मक आविष्कार आहे. त्यांचा मोहच जणु त्या प्रवृत्तीतून डोकावतो आहे. त्याला देवापेक्षा चमत्कारात रुची आहे. ही काही भक्ती नव्हे किंवा नेणतेपण देखील नव्हे. स्वर्गातील देव- अप्सरा आलेत, त्यांनी सुवर्णवृष्टी केली, स्तुती केली म्हणजे त्या व्यक्तीचे मोठेपण सिध्द झाले असे होत नाही.

आजही या विश्वात अनेक देव-देवतांची पूजा होते. लाखो लोक देवदर्शनासाठी उन्हातान्हात एकत्र होतात. ती भीड, तो जन समुदाय पाहून देवाचे देवत्व सिध्द होत नाही. माणसाच्या दुर्बळतेचा तो सबळ पुरावा आहे. तुम्ही ज्याला देव - खरा देव म्हणावा त्याचे निकष कोणते ? त्या देवा - भोवती हे जे लोकेषणेचे वलय आहे, ते काही खऱ्या देवत्वाचे चिन्ह नव्हे. तुम्ही शरण जावे, त्याला आपले म्हणावे, त्याच्याशी एकरूप व्हावे असे ते जे देवत्व आहे, ते काही अशा जडात्मक वस्तूंनी सिध्द होत नाही.

तुम्ही जो देव निवडता आहात ते त्याच्या बाह्यरूपावरून. त्या देवाभोवती जी आरास आहे किंवा त्याच्या दर्शनासाठी जे मोठमोठे लोक जमतात त्याच्यावरून ते देवत्व पूज्य आहे, असे

नाही. आपल्या साऱ्या संसारी जीवनात अशीच भ्रांती आहे. आपण मनातून भोग प्रधान आहोत. आपणाला स्वत:ला द्रव्य - संपत्ती, भपका, वैभव आवडते. ती ज्याच्याकडे सर्वात अधिक आहे, तोच आपणाला मोठा वाटतो. हे वाटणे किती तत्व-हीन आहे, किती ओंगळ आहे, किती दरिद्रीपणाचे आहे, हेच आपणाला जाणवत नाही. तुम्ही मनातून खूपच दरिद्री आहात, म्हणनूच तर अशा बाह्यरूपाला शरण जात आहात. ते शरण जाणे भगवंतांच्या ठायी नाही, तर ते शरण जाणे भौतिक स्वरूपाचे आहे. तुमची निवड चुकीची आहे. इतका वैभवशाली देव खोटा कसा असेल, इतकी सारी थोर थोर दर्शनार्थी, पूजक मंडळी चुकीची आहेत का, असाही प्रश्न तुमच्या अज्ञानी मनात जन्म घेतो. ही सारी किमया तुमच्या अंतरंगातील मोहाची आहे. रंग, रू प, वैभव, शिल्पकृतीची श्रेष्ठता हे काही देवत्वाचे खरे स्वरूप नाही. देवाला सोन्याचे व रत्नहिऱ्याने मढविलेले लाखो रुपये किमतीचे छत्र आहे, तो देव नवसाला पावतो, मनोकामना पूर्ण करतो अशी ऐहिक वासनाच तुमच्या मनात आहे. त्या वासनेला तुम्ही देवपणा देत आहात. भोग वासनेने तुम्ही त्या देवाचे मूल्यमापन करीत आहात. ज्यांचे मन अद्यापि अशा हीन भोग - वासनेत गुंतले आहे, जो देवाकडे याचना करीत आहे की मला वैभव मिळू दे, राज्यसाम्राज्य मिळू दे, यश मिळू दे, तो मनातून रिक्त आहे, स्वत: भिकारी आहे.

आचार्य श्री समंतभद्रांनी हा सारा प्रकार प्रत्यक्ष अनुभवला आहे. देशातील अनेक धर्मस्थळे त्यांनी पाहिली आहेत. तेथे जमणाऱ्या भाविकांची मन:स्थिती त्यांनी जाणली आहे. सामान्य माणूसच नव्हे तर स्वत: ला ज्ञानी म्हणविणारा माणसे देखील संसारातील प्रचंड ताण, हेवेदावे, संकटे, दु:ख यांच्यामुळे त्रस्त होऊन अशा कुदेवांच्यापुढे शरणागती पत्करत आहेत. त्यांना हवी मानसिक शांती, त्यांना हवा भोगविलास, ऐहिक सुख. मग ती सारी ऐहिक वासनांनी व्याप्त मंडळी असा देव शोधतात की जो देव त्यांना सुखी करील. त्या सुखाच्या प्राप्तीसाठी मग ते मोठमोठी देवळे बांधतात, थाटात पूजा - प्रतिष्ठा करताना विविध तऱ्हेच्या पक्वानांनी त्याची पूजा करतात. हजारो लिटर दूध, दही, तूप, केशर, चंदनाने त्या देवाचा अभिषेक करतात. हे सारे अज्ञानाने, मोहाने, अ- विवेकाने घडत राहात आले आहे. देवत्वाची जाणच मनात नाही.

दुसरा एक विचारही आचार्य यातून सांगतात की मानवाच्याच नव्हे तर साऱ्या चेतन प्राण्यातच एक ईश्वरत्व लपून आहे. त्या ईश्वरत्वाच्या भावनेचा हा दृश्य विलास आहे. प्रत्येक सचेतन प्राप्ती हा स्वत:च ईश्वर याचा तहान आहे की जी ईश्वरत्वाप्रत नेण्याचे कार्य करते.

आचार्य अमृतचंद्रांनी आत्म्यातील ज्या अनेक शक्तींचा शोध घेतला, त्यात एक ईश्वरत्व शक्तीही आहे. तो ईश्वर होय. त्या आत्म्यातूनच देवत्वाचा विचार सर्व विश्वात प्रस्फुटित, व्यक्त होत असल्याचे दिसून येते. साऱ्या देशातून अशी ईश्वराची आराधना चालू आहे. युगानुयुगे माणूस देव- पूजक आहे. शेंदूर लावलेल्या दगडापासून ते विविध प्रकारच्या देव - देवतांना तो भजत आला आहे. त्या साऱ्या देव - देवतांचया तो दास होत आला आहे. त्या देवपूजेच्या निमित्ताने तो स्वत:च्याच मनात कल्पिलेल्या देवाची पूजा बांधत आला आहे. अगदी रानटी अवस्थेत असणारे समाज देखील वृक्षांची, दगडांची, नदीची, समुद्राची पूजा करताना आढळतात. त्यांची कल्पना असते की 'देव' त्यांचे रक्षण करील. दु:ख निवारण करील. शारीरिक पीडा, संकटे दूर सारील. त्यामुळे विश्वात नव - नवी देवालये, पूजा स्थाने निर्माण होत आहेत. ते काही आजचे नाही, युगानुयुगे ते चालू आहे. देव आणि भक्त असे चित्र साऱ्या जगात आहे. देवत्वाच्या कल्पनेला खरे मानणारी व अशा देवाला, त्या देवाच्या पूजेला नकार देणारी मंडळीही युगा - युगातून जन्मलेली आहेत. एका विचाराच्या विरोधात दुसरा विचार जन्मतो. पक्ष तेथे प्रतिपक्ष असतोच.

म्हणून आचार्य श्री देवागम स्तोत्रातून देवाचे देवत्व शोधत आहेत. खरा देव कोणता ? देव कल्पनेमागे मानवाची मानसिक अवस्था कोणती ? का हवा त्याला देव ? का हवी आहे पूजा, का हवे वंदन, नमन ? ही केवळ मानसिक भावना आहे, अगतिकतेची भावना आहे ? की त्या भावनेच्या आतही एखादे सुंदर, अनाकलनीय दिव्यत्व लपले आहे का ? याचा शोध - बोध या ग्रंथातून ते घेत आहेत.

आचार्य आहेत प्रज्ञावान. ते आहेत तर्काला प्राधान्य देणारे. जे तर्कात बसत नाही, ते स्वीकारणे त्यांच्या मन:प्रवृत्तीत बसत नाही. मग ते शोधत राहातात, तपासत राहातात विविध विचारांच्या कल्लोळांना, भाव - भावनांना. दृष्टी आहे केवळ संशोधकाची, असेही म्हणू नका. ते एक उत्कृष्ट भक्ती म्हणजे एकरू पता. भक्ती म्हणजे समर्पण. हातचे काहीही राखून न ठेवता होणारे समर्पण डोळस हवे, दृष्टी स्वच्छ हवी. गतानुगतिकतेने, परंपरेने, कुलाचवाराने जे देवत्व स्वीकारले आहे, ते सर्व बाजूने तपासूनच ते स्वीकारणार आहेत. जव्हेरी जेव्हा रत्न- हिरे घेतो तेवहा तो त्याचा जाणकार असतो. तो त्या हिऱ्यांची पाहणी करतो, त्याचे मोल जोखतो. तसे देवत्वाचा हिरा देखील ते खूपच सावधानतेने, विवेकाने, विवेचकतेने तपासून पाहात आहेत. तुम्हालाही सावध करीत आहेत. न जाणो तुम्ही देखील अविवेकाने, अज्ञानाने कुणाला तरी देव

मानून बसाल. दगडालाच हिरा समजून बसाल. हजारो वर्षे जरी तुम्ही दगडाला हिरा समजत बसलात तरी दगड म्हणजे हिरा नव्हे.

म्हणून एक अत्यंत सामाजिक समजली जाणारी बाब म्हणजे देवत्व, देवपूजा, देववंदना आहे. ती जनमानसात इतकी दृढमूळ आहे की तपासून पाहाणे देखील सामान्य माणसाला जमत नाही. त्याला वेळ नाही किंवा तशी विवेचक बुध्दीही नाही. त्या देववंदनेत यांत्रिकता आली आहे. तंत्रही आले आहे. ह्रदयातील भक्तीभाव, उत्कट समर्पण हरवले आहे. अशी यांत्रिकरीतीने होणारी पूजा मग फलदायी होत नाही. फल न मिळाले तर मग देवावरची श्रध्दा, भक्ती राहात नाही. माणूस निराशेच्या गर्तेत जातो. मग देवही बदलतो. आज तिरुपती, उद्या सम्मेद शिखरजी, वैष्णव देवी, कालिकामाता, चंडी, सरस्वती, अशा अनेक देवतांचा जन्म होतो. संकट हरण करणारी देवता, ज्ञानाची देवता, संगीताची देवता, नाट्याची देवता, सूर्य - चंद्र इत्यादि देखील देवता. अशी असंख्य देवतांची रांगच रांग तयार होते. रोज एका देवतेची पूजा करायची म्हटले की सारा जन्म तेहतीस कोटी देवांच्या पूजेतच जाणार. असाही विचार संभवतो. म्हणून आचार्यांनी या स्तुती काव्यात मार्मिकतेने पण तर्काधिष्ठित विचाराने खऱ्या देवाचा शोध घेण्याचे ठरविले आहे. त्यांच्या विचारांच्या संदर्भात आपणही आपली देव - कल्पना तपासून पहायला हवी.

खरे तर या गाथेतून देव व भक्त यांचा मोठा मनोरम, विवेचक असा संवाद आहे. तोही पाहाणे आल्हाददायक आहे.

स्वामी श्री समंतभद्र जणु देवा समोर उभे आहेत. ते त्या देवाला वंदन करीत नाहीत. तेव्हा देव म्हणतो - ‘‘ अरे भक्ता, असा उभा का राहिला आहेस ? मीच खरा देव आहे. हे पाहिले नाहीस का, की स्वर्गातील देव- देवता विमानातून येऊन मला वंदन करीत आहेत. नृत्य करीत आहेत. त्या सुंदर, कमनीय अप्सरा सहस्त्र चामरांनी मला जणु ‘हवा’ घालित आहेत. ती चामरे देखील सुवर्णांची आहेत. रत्न हिऱ्यांनी सुशोभित आहेत. माझे सिंहासन तरी पहा कसे बावन्नकशी सोन्याचे आहे. माझ्या डोक्यावर सुवर्णांनी निर्मित, कला - कुसरपूर्ण तीन छत्रे आहेत. मागे आभामंडळ आहे. अष्ट प्रातिहार्ये आहेत. माझ्या या सभेत, पहा तरी, किती थोर थोर, महाराजे, चक्रवर्ती, सम्राट माझा उपदेश ऐकण्यासाठी उपस्थित झाले आहेत. ही सारी

चमक-दमक पाहून तुला असे नाही वाटत की मी खरा पूजनीय देव आहे. माझ्याहून अन्य कोण आहे की ज्याच्या चरणी अशा थोर थोर विभूजी नम्र होताता. ?''

त्यावर भक्त म्हणतो की- "हे सारे जे बाह्य वैभव असल्याचे तू सांगत आहेस, त्यात नवल काहीच नाही. ते वैभव म्हणजे तू नाहीस. तुझे रंग-रूप-लावण्य, वैभव, ऐश्वर्य म्हणजे काही तू नाहीस. ते तर प्रगटपणे तुझ्याहून अत्यंत वेगळे आहेत. अशी सारी भौतिक किमया तर कोणताही कुशल जादुगारही निर्माण करू शकतो. ती जादुगिरी म्हणजे 'देवत्व' असे मी समजू काय ? इतर सामान्य माणसे मोहग्रस्त असल्याने, तुझ्या चमत्काराने दिपतात. पण मी तर तुझे देवत्व, तुझा देवपणा तपासून पाहून मगच तुझा आदर, पूजा, सन्मान करणार आहे. तुझी जी महानता आहे, मोठेपणा आहे तो काही या सा-या बाह्य वैभवावरून सिध्द होत नाही. भक्ताला तारण्याचे, उद्‌बोधन करण्याचे, त्याच्या मुक्तीचे नेतृत्व करण्याचे सामर्थ तुझ्या आहे की नाही, हे मला पारखून पाहावे लागणार आहे.

'' तू असे गृहीत धरू नकोस की मी एक भोळा - भाबडा भक्त आहे. मी काही तुझ्या वैभवाला हुरळून जाऊन नमस्कार करणारा नाही. माझी जातकुळी इतर सामान्यजनाहून वेगळी आहे. मी तर परीक्षा - प्रधानी व्यक्ती आहे. मी तर परीक्षा -प्रधानी व्यक्ती आहे. सर्व तऱ्हेने तुझी परीक्षा घेऊनच मग ठरविणार आहे की तुझ्या देवत्वाला वंदन करायचे की नाही . मी माझ्या परंपरेला धरून आहे. मला तुझ्यात देवपणाची खात्री वाटेल, असे काही तरी सांग. तुझे सांगणे युक्ती, प्रमाण, हेतू यांनी सुशोभित हवे. हे काय दाखवतोस की माझे असे वैभव आहे, तसे वैभव आहे. ''

असा एक संवाद भक्त आणि देवात सुरू आहे. तुमच्याही मनात अशी भावना असावी. ज्याला वंदन करायचे, ज्याची मनोभावे पूजा - अर्चा करायची, तो देव खरा तरी असायला हवा. चार आण्याची वस्तू घेताना ती चांगली पारखून, तपासून घेता. दुकानदारावर विश्वास ठेवत नाही. मग मी तर खऱ्या देवत्वाच्या शोधात असणारी व्यक्ती आहे. तुझ्यातील गुणावगुणांची मीमांसा, चर्चा, विचार केल्याशिवाय हे माझे मस्तक मी तुझ्या चरणी नम्र करणार नाही. अशी ही एक भक्ती जी बुध्दिनिष्ठ आहे, जी देवत्वाची परीक्षा घेते, वैचारिक बाजूला प्राधान्य देते, कारण ती डोळस आहे, पण नम्र आहे. ती भक्ती चोखंदळ आहे. हेच आचार्यांच्या भक्तीचे अनुपम लावण्य

होय. आचार्यश्री बाह्य सौंदर्याला, मुलाम्याला, साजाला महत्व देत नाहीत. जसे, पॅकिंग खूप आकर्षक आहे, म्हणून काही वसतू सुंदर असेल असे नाही. जसे, आरशांत सौंदर्याचे सुंदर प्रतिबिंब पडले असले तरी त्या सौदर्याचा उपभोग नाही घेता येत. बिंबच प्रतिबिंब घडविते. म्हणून ते बिंब काय आहे, ते चैतन्य काय आहे की ज्याचे प्रतिबिंब परमात्मरू पात प्रकटते. मोठे सुंदर विश्लेषण आचार्य या कारिकेतून करतात. त्या कारिकेतील मायाविष्पि दृश्यंते या शब्दाकडे नीट पाहिले पाहिजे. मायाचार, कपट, ढोंग, वरवरलेपणा हा फसवा असतो. तो मोह घालू शकतो. मृगजळाचे पाणी जसे तहान भागवू शकत नाही, पण दमवते, भ्रमण करायला लावते, त्राही भगवान करून सोडते, तसे मायाचाराचे म्हणजे खोटा, फसवा, छळणार, आशाळभूत करणारा पण अंती वांझ. आचार्य श्री उमास्वामींनी तत्वार्थासूत्रात म्हटले की - ‘ माया ’, मायाचार म्हणजे पशुता, पाशविकता. पशु म्हणजे प्राणी असा अर्थ नाही घ्यायचा, केवळ पशु म्हणजे जो पाशांनी बांधला जातो. पशु हा बध्द, वापरतात. जी भक्ती संसार बध्द करील, संसारात भ्रमण करायला लावील ती भक्तीचे नव्हे.

आणि हेही खरेच आहे की तुम्ही ज्याच्याठायी एकरूप होत आहात तोच तुमचा देव. त्याचे सारे अनंत ज्ञान, दर्शन, सुख - वीर्य हेच तर त्याचे गुण व तेही तुमच्याच आत्म्याचे अप्रगट गुण. एक कच्चा माल आहे, दुसरा अत्यंत विशुध्द. तुम्ही संसारातही कच्चे व मोक्षमार्गातही कच्चे, अपरिकक्क. हा जो कच्चेपणा आहे, त्यामुळेच तर मोह होतो. - मागण्याचा. तुम्ही अपात्र आहात हे खरे, पण पात्रतेसाठीच भक्ती हवी आहे. देवदर्शन हवे आहे. ‘‘ त्वद् भक्तिरेव मुखरी कुरुते बलात् मां ’’ तुम्ही अशक्त, दुर्बळ असमर्थ आहात संकटांना, संघर्षाला, दुःख भोगण्याला. म्हणूनच तर देवाकडे जाता. ती भक्तीच मग हळूहळू तुमच्यातील सामर्थ्य प्रगट करते. भुंग्यांच्या स्पर्शाने फूल उमलते, सूर्याच्या कोवळ्या किरणांच्या स्पर्शाच्या जादूनेही तेच घडते, तसे भक्तीच्या संमोहनाने आत्म - कमल प्रफुल्लित होते.

मीरा भगवत् भक्तीत इतकी तल्लीन की ती विषप्राशन करायला देखील घाबरत नाही. जो घाबरेल तो भक्त कसा ! भक्ती अमृत आहे. त्या अमृताने सारा भव- पाश जळून जातो. भ. महावीरांचा भक्तिमार्ग थोडा वेगळा आहे. तो मार्ग नृत्याचा नाही, संगीताचा नाही. महावीरांचा मार्ग तपश्चर्येच्या दृढतर साधनेतून जातो. ते तुम्हाला शिथिलपणे वागू देणारे नाहीत, मोहात

अडकू देणार नाहीत. त्यांच भक्तीसाधना एक 'योग' बनून जातो. तो योग इंद्रियांना, इंद्रिय भोगांना, विषयवासनांना समाप्त करून टाकील. दिव्यत्व प्राप्त करायचे तर तपातून, अग्नि दिव्यातूनच गेल पाहिजे. टाकीचे घाव सोसल्यावाचून देवपण येत नाही. अशी सुंदर म्हण आहे. ती जैन संस्कृतीची रीत सांगते. भक्तीतून वैराग्य जन्मते, कारण जैन संस्कृतीत असे सांगितले आहे की यच्चयावत् जीवराशी मोक्षमार्गाच्या दिशेनेच जात आहे. सारे जीव तुमच्या मोक्षमार्गाचे सह - प्रवासी आहेत. त्यांचा व तुमचा अधिकारही सारखाच आहे. मुक्ती ही काही दुर्मिळ अभिलाषा नाही आहे, ती तर आत्मज्योत आहे. आत्मज्योत ऊर्ध्वगामीच असते. तिला निम्न होणे माहितीच नाही आहे.

'महान' हाही सुंदर शद्व यात आहे. 'द ग्रेट ' आणि ग्रेटनेस हेच तर जीविताचे लक्ष आहे. सारे विश्व व त्या विश्वाची अनंतानंत रहस्ये तुमच्या तळहातावर दिसतील व ती तुम्ही जाणून घेऊ शकाल ही महानता साऱ्या जीवराशीत आहे. कुणीही उच्च नाही, नीच नाही. ही समानत्वाची शिकवण हजारो-हजारो वर्षापासून जैन - भक्ती देत आली आहे. अशा समानत्वाची, समतेची दिव्य ज्योती म्हणजेच धर्म. तोच आत्मा, तोच परमात्मा. भक्तीतूनच परमात्मा प्रगट होतो. भक्तीतूनच सारे साहित्य, सारी कला, संगीत उत्पन्न होते. तसेच जीवनातून जे सौंदर्य, कारुण्य, प्रेम, सद्भावना दिसून येते ती भक्तीतून. म्हणून 'महान' हा सुंदर शद्व भगवंतांच्या श्रेष्ठतेची प्रतीक आहे. ज्या भव्य-दिव्यतेचे स्वरूप 'महान' शद्व व्यक्त करतो तसा अन्य शद्व करीत नाही. आजही आपण 'भारत देश महान' असा उद्घोष करतो. खरे तर आत्म्याच्या परमात्मरू पाला 'महान' म्हटले आहे. आपण सारे जण त्या 'महानतेला' पूज्य मानत आहोत. अशी श्रेष्ठतम 'महानता', हीच भगवत्ता आहे. अशा महानतेचा उपासकही महान होऊन जातो.

असा जीवात्मा शोधणेही मुश्किल आहे, दुरापास्त आहे की ज्याचे पाऊल महानतेकडे पडत नाही. सारे जीवच जणु त्या मोक्षमार्गातील प्रवासी आहेत. हीच सूचना तत्वार्थसूत्रात आचार्य श्री उमास्वामींनी दिली आहे - आपल्या मंगलाचरणात.

'' मोक्षमार्गस्य नेतारं'' नेता कसा ? जो मुक्तीचा मार्ग सांगेल, मुक्तीसाठी ज्याने मार्गावतरण केले असेल, मुक्तीसाठी हाक दिली असेल व जे मुक्तीसाठी आता, आज उत्सुक आहेत त्या सर्वांचे नेतृत्व करायला जो समर्थ तो महान. अशी महनीय व्याख्या आहे आचार्यांची.

असे म्हटले जाते की तेच मंगलाचरण -

मोक्षमार्गस्य नेतारं, भेत्तारं कर्म भूभृताम् |

ज्ञातारं विश्वतत्वानां, वंदे तद्‌गुण लब्धये ||

या ग्रंथाचा आधार आहे. भगवंतांची जी जी स्तुती-सुमने भक्तीने उधळली, समर्पित केली ती सारी या मंगलाचरणाच्या आधाराने. मोठे चमत्कारिक मंगलाचरण आहे. तेथे कुणा व्यक्ती-विशेषाची भक्ती नाही, वंदना नाही, पूजा नाही. व्यक्तिवादापेक्षा व्यक्तित्व पूज्य आहे, जिनत्व वंदनीय आहे. कारण ज्या अंगभूत, अविनाशी अशा गुणांनी ती व्यक्ती आविर्भूत आहे, त्याच गुणांच्या प्राप्तीसाठी भक्तीचा महिमा आहे. जैन भक्तिशास्त्र हे असेच गुणपूजक राहात आले. क्कलिटेटिव्ह रुपच पूज्य. मूर्ती दगडाची, लाकडाची, सोन्याची, चांदीची आहे, हे भक्त पाहातच नाही. पाहील तो भक्तच नव्हे. भक्त जाणतो की हे व्यक्तिमत्व तर अनंत गुणांचा सागरच होय. त्याचे शद्बातून पूर्णरूप प्रकट करणे कसे शक्य आहे ? जो भक्त जाणतो स्वतः ची पात्रता, की अरे, मी तर अगदी काठावरच उभा आहे, मध्ये आडवा आला आहे भवसागर. त्या भवसागराच्या पलिकडे तो दिव्य भगवंत उभा आहे. त्यानेच तर साद घातली आहे, त्याचेच तर आमंत्रण आहे. म्हणून भक्त आतुर आहे. जो आतुर नसेल तो भक्ती जाणत नाही. एकदा जरी त्या परमपावन भगवंताच्या अंतरंगाचे दर्शन घडले तरी तो खुपच समाधानी आहे. त्या दर्शनाने त्याच्या श्रध्देची पात्रता, परिपक्वता वाढत जाणार आहे. तो भक्त त्या परमात्म्याशी एकरूप होऊ इच्छित आहे. हाच भक्तिमार्ग युगायुगातील संतांनी आपला मानला आहे.

## : २ : रूप अनुपम लोभसवाणे

अध्यात्मं बहिरप्येष विग्रहादि महोदयः |

दिव्य : सत्यो दिवौकस्स्वप्यस्ति रागादिमत्सु सः || २ ||

अर्थ : आणि आत्ता जे अंतरंग व बहिरंग रूपाने तुमचे जे शरीर सुशोभित, मोहक दिसत आहे, ते तर खात्रीने दिव्यतेला धारण करणारे व डोळ्यांना साक्षात् दिसणारे (सत्य) आहे, त्याचेही मला काही आश्चर्य वाटत नाही, कारण असे दिव्य, आकर्षक रूप तर स्वर्गीय देवांनाही प्राप्त आहे.

स्पष्टार्थ विवेचन : आचार्य म्हणतात की हे प्रभो, तुम्ही जर असे म्हणत असाल की तुमच्या शरीराच्याठायी आता क्षुधा - (भूक), तहान, जरा-रोग-अपमृत्यु वगैरे नाहीत किंवा तुमचे दिव्य शरीर अत्यंत शोभायमान, सुंदर, गौरवर्णीय आहे, तुमच्याठायी सारी निर्मळता आहे. अपवित्रता नाही, तर त्याचेही मला मोठे आश्चर्य वाटत नाही. अठरा दोषांनी तुम्ही रहित आहात, निः स्वेदपूर्ण आहात, सुगंधित देहाचे धारक आहात, पण त्याहीमुळे आप्त (देव) होऊ शकत नाही.

कारण अशी सुंदर शरीर संपदा तर स्वर्गातील देव-देवतांनाही प्राप्त आहे. ते सारे स्वर्गातील देव तर क्रोधादी विकारांनी, भोगवासनांनी युक्त आहेत. केवळ तुमच्या देहाच्या सौंदर्यामुळे तुम्हाला आम्ही आप्तपणा देऊ शकत नाही.

येथे पुनः आचार्य त्या देवाशी संवाद करीत आहेत. देव म्हणतो की - अरे भक्ता, मी चार घातिया कर्मांचा नाश केल्याने ही दिव्य, परम औदारिक देहाची प्राप्ती मला झाली आहे, हे सारे समवशरणाचे वैभव मला प्राप्त झाले आहे. येथे मायाचाराचा मुद्दाच उपस्थित होत नाही. हे काही ढोंग नव्हे की जादुगिरीही नव्हे. तू आगम तरी प्रमाण मानतोस की नाही ? आगमात देखील माझ्या परम औदारिक शरीराचे वर्णन आहे. मी देव - देवेंद्र वंद्य आहे. मी चालताना माझ्या प्रत्येक पावला गणिक सुंदर कमळांची उत्पत्ती होत असते. वारा सुगुंधित वाहात असतो. साऱ्या ऋतूतील

फळे, फुले एकाच वेळी बहरून येतात. जवळपास दुष्काळादेखील फिरू  शकत नाही. माझ्या उपस्थितीतूनच सारी सृष्टी बदलून जाते.

आचार्य म्हणतात - ''हे प्रभो, तुम्ही जे हेतू, जी कारणे, जी वस्तूस्थिती सांगत आहात, त्यातही काही सम्यक् हेतू दिसून येत नाही. तुमच्या परम औदारिक शरीराचे मला काही आकर्षण नाही. ते शरीरही काही शाश्वत नाही. ते शरीर देखील कर्मपरमाणूंच्या समूहाला धारण करणारे आहे. जे जे तुम्ही वर हेतू दिले, त्यात शाश्वतपणा कुठे आहे ? इंद्रधनुष्याप्रमाणे ते सारे वैभव क्षणभंगुरच नव्हे काय ? ''आणि आता तुम्ही जो आगमाचा दाखला प्रस्तुत केला आहे, तो देखील पूर्णतः प्रमाण मानता येत नाही. देव मानणाऱ्याचे जसे आगम आहे, तसे देव न मानणाऱ्यांचेही आगम आहे. त्या दोन्ही आगमांची चिकित्सा केल्याशिवाय खरे आगम कोणते व खोटे आगम कोणते याचा निर्णय होत नाही. प्रत्येक धर्म संस्थापकांनी, धर्म प्रचारकांनी आपआपली आगमे तयार केल्याचे दिसते. तेव्हा आपले आगमही मला अंधपणे स्वीकारता येणार नाही. अंधतेने मी काही स्वीकारू  शकत नाही. डोळ्याला झापडे बांधून परंपरेचा मी स्वीकार नाही करू  शकत. तेव्हा तुम्ही जो आगमाचा, परंपरेचा दाखला देत आहात तोही काही खऱ्या कसोटीला उतरत नाही.''

''माझ्या मते सर्वाहून अगदी भिन्न अशी ओळख सांगा की ज्यामुळे मी आपणाला आप्त (खरा देव ) म्हणावे. असे वर्णन नका सांगू की जे इतरांनाही लागू होईल. 'अप्त' हा शब्दच मुळी मोठा गोड आहे. परमात्म्याला आप्त म्हणणे देखील मोठे मधुर आहे. आप्त कसा असावा ?'' यासाठीच तर आपले उत्तर ऐकून घ्यायला मी अधीर आहे, उत्सुक आहे." या कारिकेत (श्लोकात) 'महोदय' हा एक मोठा लक्षणीय शब्द आहे. आपले संसारिक जीवन हे कर्मोदयाने व्याप्त आहे. रोज, क्षणोक्षणी पूर्वसंचित कर्मांचा उदय होतो व त्या उदयाच्या वेळी आपला आत्माही त्यात सहभाग होतो. जे आज सुख, दुःख, विपदा, संकटे, दुर्दैवी वा सुदैवी घटना जीवनात घडतात त्याला पूर्वसंचितांचे निमित्त असते. अरिहंत प्रभूंनी जरी चार घातिया कर्मांचा नाश केला असला व त्या निमित्ताने जरी त्यांचे बाह्य शरीर व अंतरंगीची पर - सापेक्ष उत्तुंगता, भव्यता, दिव्यता दिसत असली तरी ती कर्मसापेक्ष असल्याने आचार्य त्याला आप्तता म्हणत नाहीत. दिव्यता तर आहे, त्यात मायावीपण, दिखावा नाही. हे तर उघड सत्य आहे. पण त्यात जी

कर्म - सापेक्षता आहे, ती आप्तपणा दर्शवीत नाही. आचार्य म्हणतात - ‘‘ हे प्रभो, आम्हाला असा विशुध्द हेतू सांगा, तुमचे असे शुध्द, निखळ स्वरूप सांगा की ज्यामुळे केवळ तुम्हीच प्रतिभासित व्हाल. एक अणुमात्र ही पर - प्रकाशित लक्षण नका सांगू की जो आप्तपणाला दूषण देईल. आचार्यश्रींची भक्ती करण्याची रीत वैज्ञानिक आहे. ते सर - भेसळ स्वीकारीत नाही. त्यांचा विचार दिवत्व म्हणजे संपूर्ण देवत्व. प्रभू कुंद कुंद देवांनी समयसारात तेच कथन केले. ते म्हणतात - ‘‘मला ‘स्व-समयात’ विराजमान प्रभूच वंदनीय आहेत. पर-समय (कर्मबध्द, अचेतन) मला नका सांगू. त्या स्व - समयात म्हणजे संसार - ग्रस्ततेचे बंधन नसलेल पोटेंट स्वरूप सांगा, देवत्वाचे ’’.

ही जी उच्चतच ज्ञानात्मक, वैज्ञानिक स्वरूपाची मागणी आहे, ती महत्वाची आहे. तुम्ही काहीही, कसेही स्वीकारायचे नाही. जे स्वीकारायचे ते शंभर टक्के शुध्द - टंच सोने स्वीकारायचे. अशाच गुरुंचा वरद्हस्य हवा आहे, जो तुम्हाला संसाराच्या गर्तेतून वर खेचून घेईल. जो तुमच्या संसारी जीवनाचे समर्थन करणार नाही, तुमच्यातील विकार - वासनांचे लाड करणार नाही, असा गुरूच हवा. तुम्ही असमर्थ आहात, दुर्बल आहात, आजवर अशा अनेक कु-गुरूंच्या पाया पडून पडून संसारातच राहिला आहात. तुमची श्रध्दा, तुमच्या गुरू संबंधीच्या कल्पना, देवसंबंधीच्या संकल्पना विकारवश आहेत. तुम्हाला हवेत कषाय, हवेत विकार. मग तुम्ही असेच देव निवडता जे विकारी आहेत. ज्यांचे जीवन वासनामुक्त नाही, असे देव, व गुरू तुम्हाला काहीच मदत करू शकत नाहीत. असे गुरू म्हणजे आणखी एक बेडी. म्हणून आचार्य म्हणतात - नको, नका सांगू तुमचे भौतिक वैभव, तुमच्या बाह्य दिव्यत्वाचे रूप. ते सारे आम्हाला ठाऊक आहे. ज्या समवशरणातील चमत्कारांच्या, वैभवांच्याबद्दल तुम्ही सांगता आहात, तेही सारे नश्वर आहे. त्यांचा व तुमचा काही एक संबंध नाही. ते सारे अचेतनाचे विश्व आहे. ज्ञानालाच आत्मा समजणाऱ्याच्या जातकुळीचे आम्ही उपासक आहोत. परद्रव्याच्या एका अणुमात्राचे आम्हाला आकार्षण नाही. म्हणून कृपा करून तुमच्या ऋध्दी - सिध्दीचे दर्शन आम्हाला नका घडवू. पुण्य - पापांचाही आम्हाला वासना नका दाखवू. स्वर्गादिक सुखांच्या प्राप्तीची लालसाही आमच्यात नका निर्माण करू .